दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १२५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२९ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पूरग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची राज्य सरकारची मदत जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवल्यानंतर झालेल्या मोठ्या मनुष्यहानी आणि वित्तहानीनंतर राज्य सरकार मदतीबाबत आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत काय निर्णय घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. मात्र, आजच्या बैठकीत मंत्रिमंडळाने मदतीबाबत अंतिम निर्णय राज्यातील पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून प्रत्येकी १० हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे.**



मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत पूरग्रस्त भागांमधील नुकसान भरपाईबाबत चर्चा झाली. मात्र पूरग्रस्त भागातील पंचनाम्यांचे काम अजूनही पूर्ण होऊ न शकल्याने सरकारकडे नुकसान किती झाले याबाबतची आकडेवारी उपलब्ध नसल्याने सरकारला मदतीचा अंतिम निर्णय घेता आलेला नाही.

महाराष्ट्रात मुसळधार पावसाने थैमान घातल्यानंतर कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात दरडी कोसळून अनेक लोकांचे बळी गेले. तसेच मोठे आर्थिक नुकसानही झाले. मुसळधार पावसाचा राज्यातील एकूण १० जिल्ह्यांना फटका बसलेला आहे. हे पाहता नियमांच्या पलिकडे जाऊन पूरग्रस्त भागाला मदत करावी यावर मंत्रिमंडळाचे एकमत झाले.

विशेषत: मदत देण्याबाबत विचारविनिमय करताना एनडीआरएफच्या निकषानुसार मदत न देता एनडीआरएफच्या निकषांच्या पलिकडे जाऊन मदत देण्याची आवश्यकता असल्याची चर्चा आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाली. एनडीआरएफच्या निकषांच्या चौकटीत बसून मदत जाहीर केल्यास पूरग्रस्तांना तुटपुंजी मदत मिळण्याची शक्यता आहे.

महापूर आणि दरड कोसळून झालेले नुकसान अतिशय मोठे असल्याने एनडीआरएफचे निकष डावलून मदत दिली जावी यावर मंत्रिमंडळात एकमत झाले आहे.

## भाजप नेत्यांकडून महाडमध्ये पाहणी, मदतकार्याचा आढावा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अतिवृष्टीमुळे महाडमध्ये पूर व दरड कोसळल्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. पूरग्रस्त व दरडग्रस्तांच्या मदतीसाठी या ठिकाणी केंद्र व राज्यातील भाजप नेते व लोकप्रतिनिधींनी तात्काळ धाव घेऊन पाहणी केली तसेच पूरग्रस्तांना मदतकार्य देणे सुरू केले आणि त्यामुळे महाडकरांना मोठा दिलासा मिळाला.

आज बुधवारी (दि. २८) रायगडचे माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, यांनी बुधवारी महाडमध्ये जाऊन पाहणी केली तसेच मदत कार्याचा आढावा घेतला. यावेळी



पनवेलचे ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक अजय बहिरा, प्रदेश सचिव रवी मुंडे, युवा नेते दशरथ म्हात्रे, डॉ. कृष्णा देसाई, भाजप दक्षिण जिल्हाध्यक्ष ॲशड. महेश मोहिते, सरचिटणीस मिलिंद पाटील, बिपीन महामुणकर, उपाध्यक्ष राजेश



मपारा, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग, महिला मोर्चा सरचिटणीस मंजुषा कुद्रीमोदी आदी सोबत होते.

या वेळी भाजप नेते, पदाधिकार्यांनी महाड शहरात पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली तसेच भाजपच्या वतीने गुरूकुल येथे सुरू करण्यात आलेल्या कॅम्पला भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला. या ठिकाणाहून पूरग्रस्तांना अन्न, पाण्यासह कपडे, रेशन किट, अन्य मदत केली जात आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने बी. एस. बुटाला सांस्कृतिक भवनात भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तेथेही भाजप लोकप्रतिनिधींनी भेट दिली.

## संक्षिप्त...

### 'त्या' कर्मचाऱ्यांना ५० लाखांचे विमा कवच

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील क व ड वर्ग महापालिका तसेच नगरपंचायती व नगर परिषदा यामधील कोविड कर्तव्य पार पाडताना मरण पावलेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांसाठी मृत्यूपश्चात ५० लाख रुपयांचे विमा कवच देण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अ आणि ब वर्ग महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगपालिका तसेच सर्व नगर परिषदा व नगर पंचायती यांना ही योजना लागू राहील. त्याचप्रमाणे सफाई कर्मचारी, कंत्राटी व मानधन तत्त्वावरील व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचा देखील यात समावेश करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे कोविड लढाईत मृत्यू झालेल्या संबंधित नगरपालिका आणि महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वारसांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यात केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान ( ग्रामीण ) टप्पा २ अंमलबजावणीस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. स्वच्छ भारत अभियान ( ग्रामीण ) टप्पा २ ही योजना राबविण्याकरिता २०२५ पर्यंत एकूण ४६०१ कोटी रुपये खर्च होणार आहेत. केंद्राचा यात ६० टक्के हिस्सा असून राज्याचा हिस्सा ४० टक्के आहे.

## दरडग्रस्त केवनाळे पाठोपाठ साखर सुतारवाडीपर्यंतची रस्ता वाहतूक सुरळीत

### पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी सलग चौथ्या दिवशी केला पोलादपूर दरडग्रस्त भागाचा दौरा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यात गेल्या गुरुवारी दि.२२ जुलै रोजी रात्री अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना झाल्या असून केवनाळे येथे ५ जण तर साखर सुतारवाडी येथे ६ जणांचा दरडी खाली मृत्यू झाला आहे. यापैकी केवनाळे येथील जनजीवन पुर्वपदावर आणण्यासाठी पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी सलग तीन दिवस भेट दिली. यावेळी प्रशासनाकडून साखर सुतारवाडीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावरील पुलांना जोडणारे वाहून गेलेले एप्रोच रोड पुन्हा उभारून रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी मंगळवारी दरडग्रस्त सुतारवाडी भागाचा दौरा करुन पाहणी केली.



याप्रसंगी रोहे येथील सतेज आपणकर मित्र मंडळाने आंबेमाची येथील स्थलांतरित ग्रामस्थ असलेल्या नाणेघोळमध्ये तसेच दरडग्रस्त साखर सुतारवाडी व केवनाळे येथे जीवनावश्यक वस्तू व खाद्यपदार्थांचे तसेच कपडे औषधांचे वाटप केले. पोलादपूर तालुक्यातील अन्य भागांचा दरडग्रस्त दौरा करुन सर्व ठिकाणी जनजीवन पुर्ववत करण्यासाठी आपण पोलादपूर तालुक्यात नेहमी येऊ, अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी प्रतिनिधी जवळ बोलताना दिली.

दरडग्रस्त केवनाळे गावातील दौऱ्यादरम्यान ना. अदिती तटकरे यांच्या सोबत जिल्हा सेवादल अध्यक्ष वाय.सी.जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण खेडेकर महाराज, जिल्हा सरचिटणीस, सुहास मोरे, शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष अजित खेडेकर, कृष्णा करंजे, अनिलकुमार भोसले, तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पवार तसेच शिवसेनेचे राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, नरवीर प्रतिष्ठानचे रामदास कळंबे, देवळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तुकाराम केसरकर आणि पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार व प्रभारी तहसिलदार समीर देसाई आदींनी रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या दौऱ्यात सहभाग घेतला.

## सेनेच्या दणक्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन क्लासेसमध्ये समाविष्ट करून घेण्यात शाळा व्यवस्थापनाकडून मान्यता!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेंट जोसेफ हायस्कूल से.७ नवीन पनवेल या शाळेने सुमारे २५० मुलांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवल्याची तक्रार शिवसेना खांदा कॉलनीचे शहरप्रमुख सदानंद शिर्के यांना मिळाली. शिक्षणापासून वंचित ठेवून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास तसेच शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब अत्यंत गंभीर असल्याने सदर प्रकरण जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या निदर्शनास आणून दिले. यासंदर्भात शाळेच्या व्यवस्थापनाची चर्चा करण्यासाठी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने शाळेकडे धाव घेतली व मुख्याध्यापिका तुंगेकर यांना सादर प्रकरणाबाबत जाब विचारला.

यावेळेस फी थकबाकी असल्याने विद्यार्थ्यांना .../२



## ठेवीदारांना दिलासा; बँक बुडाल्यास भरपाई मिळणार लवकर ; कॅबिनेटकडून नवे विधयेक मंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बँक बुडल्यास आता ठेवींवरील विमा रक्कम प्राप्त कारण्यासाठी खातेदारांना आता फार ताटकळावे लागणार आहे. डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन (DICGC Bill 2021) अंतर्गत ठेवींवरील पाच लाखापर्यंतची विमा भरपाई ९० दिवसांत खातेदाराला मिळणार आहे. विमा भरपाईची संपूर्ण प्रक्रिया जलद करणाऱ्या 'डीआयसीजीसी विधेयक-२०२१' ला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. ज्यात विमा भरपाई रक्कम १ लाखावरून ५ लाख करण्यात आली आहे.

नुकताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला. ठेवींवर सरकारकडून पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाते. मात्र एखादी बँक बुडाल्यास खातेदाराला त्याची जमापुंजी परत मिळेपर्यंत बराच अवधी लागतो. यामुळे सामान्य खातेदारांची परवड होते. हा मुद्दा लक्षात घेत मंत्रिमंडळाने विमा भरपाई देण्याबाबतची प्रक्रिया जलद करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय रिझर्व्ह बँकेने ज्या बँकावर निर्बंध लागू केले असतील त्यांना ही लागू होईल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले.




बैठकीनंतर सीतारामन यांनी याबाबत अधिक माहिती दिली. त्या म्हणाल्या की, कोणतीही बँक दिवाळखोरीत निघाल्यास किंवा त्याचा परवाना रद्द झाल्यास, रिझर्व्ह बँकेने निर्बंध लागू केल्यास ठेवीदारांना ९० दिवसांत त्यांच्या ठेवीवरील विमा भरपाई मिळणार आहे.

एखादी बँक अशा संकटात सापडली तर सुरुवातीच्या ४५ दिवसांत खातेदार, ठेवीदारांची माहिती गोळा केली जाईल त्यानंतर ज्यांचे विमा दवे असतील ते डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशनला सोपवले जातील. पुढील ४५ दिवसांत ठेवीदारांना त्यांची रक्कम सुपूर्द केली जाईल, असे सीतारामन यांनी सांगितले.

डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशनअंतर्गत सर्व वाणिज्य बँक , विदेशी बँका त्यांच्या भारतातील सर्व शाखा, स्मॉल फायनान्स बँक, को-ऑपरेटिव्ह बँक, पेमेंट बँक यांचा समावेश आहे. या सर्व बँकांमधील ठेवींवर कोर्पोरेशनकडून पाच लाख रुपयांचा विमा दिला जातो.

प्रत्येक बँकेचा विमा प्रीमियम वेगवेगळा आहे. यापूर्वी १०० रुपयांवर १० पैसे प्रीमियम आकारला जात होता तो आता १२ पैसे करण्यात आला असल्याचे सीतारामन यांनी सांगितले.

## पूरग्रस्तांना भाजपकडून आधार; पनवेल महिला मोर्चाकडून महाडमध्ये महिलावर्गाला कपडे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अतिवृष्टीमुळे महाडमध्ये पूर येऊन नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक कुटुंब या पुरामुळे हतबल झाली आहेत. त्यांना या संकटकाळात आधार म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमधून शक्य होईल ती सर्व मदत केली जात आहे. याच सेवाकार्यात योगदान देत भाजप महिला मोर्चा पनवेल शहर मंडलच्या वतीने मंगळवारी (दि. २७) महाडमधील महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले.



महाडमधील पूरग्रस्तांसाठी मदत व्हावी यासाठी भाजपने पुढाकार घेतला आहे. त्याचबरोबर यात योगदान देण्याचे आवाहन नागरिकांनाही करण्यात आले आहे. त्यास नागरिकांनी .../२

## उरणमध्ये महागाई विरोधात जनवादी महिला संघटनेची निदर्शने

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र व राज्य सरकारच्या जनताविरोधी धोरणांमुळे करोना काळात ही प्रचंड वाढत्या महागाईला जनतेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्याना जीवन जगणे कठीण बनले आहे. या विरोधात मंगळवारी जनवादी महिला संघटनेच्या वतीने उरण मधील गांधी चौकात महागाई विरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणा देण्यात आल्या ,करोना काळ असतांनाही उरण तालुक्यातील विविध गावातून महिला या निदर्शनात सहभागी झाल्या होत्या.



महागाई कमी करा, सर्व नागरिकांना किमान १५ किलो धान्य वाटप करा, महागाई वाढविणाऱ्या वाढविणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, सर्वांना मोफत व मुबलक लस पुरवठा करा आदी मागण्यांसाठी घोषणा देण्यात आल्या. यावेळी जनवादी महिला संघटनेच्या राज्य नेत्या हेमलता पाटील यांनी केंद्र सरकारच्या जनताविरोधी धोरणाचा समाचार घेतला तर जनवादी महिला संघटनेच्या रायगड जिल्हा अध्यक्ष ज्योती म्हात्रे यांनी सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी सरकारने धोरणे राबविण्याची मागणी केली.

तर कुसुम ठाकूर यांनी .../२

# ईशान्येतील रक्तखुणा

आसाम आणि मिझोराम यांच्या सीमेवर दोन शत्रुराष्ट्रांमध्ये व्हावी, तशी सशस्त्र चकमक झाली. यात आसाम पोलिसांचे सहा जवान मारले गेले. अनेक जखमी झाले. यानंतर मिझोरामच्या सीमाभागात जो विजयोत्सव चालू होता, तो राज्यांमधला सीमावाद आणि त्यातून जन्मणारे शत्रुत्व किती टोकाला जाऊ शकते, याचा निदर्शक होता. आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या ईशान्येतील आठ राज्यांमध्ये सीमावर्ती अरुणाचलचा भूप्रदेश सर्वांत विस्तीर्ण असला तरी दुसऱ्या क्रमांकावरचे आसाम हेच खऱ्या अर्थाने ईशान्येतील सर्वांत मोठे राज्य आहे. तेथील लोकसंख्या इतरांपेक्षा जास्त आहे. रोजगार किंवा इतर संधींसाठी साऱ्या ईशान्येतून आसामकडे सतत ओघ चालू असतो. आसामच्या या नैसर्गिक वर्चस्वामुळेच ईशान्येतील इतर राज्यांमध्ये काहीशी असूयेची, रागाची भावनाही आहे. इतर सातही राज्यांना सीमा लागून असणारे आसाम हे ईशान्येतील मध्यवर्ती राज्य आहे आणि त्याचे केवळ मिझोरामच नव्हे तर मेघालय, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश अशा चार राज्यांशी सीमाविवाद आहेत. स्वातंत्र्यानंतर अगदी अलिकडेपर्यंत ईशान्येचा नकाशा बदलत आला आहे. आधी केंद्रशासित प्रदेश आणि नंतर स्वतंत्र राज्ये असा प्रवास होत आला आहे. यात मिझोरामही आले. आसाम–मिझोराम यांची सीमा १६५ किलोमीटरची आहे. आसामच्या बाजूने कछार, करीमगंज आणि हैलाकांडी हे जिल्हे येतात; तर मिझोरामच्या बाजूने ऐजॉल, कोलासिब आणि मामित हे जिल्हे. गुवाहाटी या आसामच्या राजधानीत सातही राज्यांमधील लोक अनेक कारणांनी ये–जा करीत असतात. तरीही, मिझो जनसमूहांमध्ये आसामविषयी जो तीव्र राग आहे, तो या हल्ल्यातून दिसला. आसामी पोलिसांना सब मशिनगन वापरून ठार मारण्यात आले. यात जे अधिकारी जखमी झाले त्यात वैभव निंबाळकर हे मराठी आयपीएस अधिकारीही आहेत. मिझोराममध्ये दहशती व फुटीर कारवायांचा मोठा इतिहास आहे. लालडेंगा यांच्या नेतृत्वाखाली 'स्वतंत्र राष्ट्रा'च्या मागणीसाठी बराच काळ तेथे सशस्त्र चळवळ चालू होती. या पार्श्वभूमीवर आसामी पोलिसांवर हा गोळीबार दहशतवाद्यांनी केला असेल तर ती अतिशय चिंताजनक बाब आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व शर्मा यांचे म्हणणे, हा गोळीबार खासगी व्यक्तींनीच केला. हा प्रकार आज जे सीमांकन झाले आहे, त्यानुसार आसामच्या हद्दीत झाला. त्यामुळे, चौकशीत काय ते कळेलच. देशात अनेक सीमावाद आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यासहित अनेक राज्ये यासाठी अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत भांडत असतात. आंदोलकांवर लाठीमारही होतो. मात्र, एका राज्याच्या पोलिसांना सीमावादातून थेट ठारच मारले जाते, हा भारताच्या एक राष्ट्र म्हणून असणाऱ्या एकात्मतेवरचा मोठा आघात आहे. शर्मा आसामचे मुख्यमंत्री झाल्यापासून तेथे पोलिसांच्या सशस्त्र कारवायांमध्ये अचानक वाढ झाली आहे. यातून आसाम व मिझोराम यांच्या सीमेवर काही ठिणगी पडली आहे का, याची उच्चस्तरीय चौकशी केंद्र सरकारने करायला हवी. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी शिलाँगमध्ये बैठक घेतली होती. त्यानंतर लगेच हा हिंसाचार झाला. ईशान्येचा भूभाग हा चीनला लागून असल्याने त्याचे सामरिक महत्त्व वेगळे सांगायला नको. एकंदरीत ईशान्येत सध्या शांतता असली तरी तेथे हिंसाचाराचा आश्रय घेणारे अनेक गट, संघटना आजही आहेत. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रे आहेत. तेव्हा ईशान्येतील विविध राज्यांच्या सीमावादाचे किंवा इतर वादांचे निमित्त करून हिंसाचाराचा भडका उडवून देण्याचा डाव शत्रुदेशांच्या गुप्तचर यंत्रणा आखत नसतीलच, असे नाही. दोन राज्यांमध्येच अशा चकमकी झाल्या की, 'राष्ट्र म्हणून तुम्ही कुठे एक आहात'? असा ठपका ठेवता येतो. तेव्हा, आसाम सरकारने सीमेवर सुरू केलेले रस्त्याचे काम हे निमित्त ठरले असले तरी यामागे मोठे कारस्थान असू शकते. यातून केंद्र सरकारने घ्यावयाचा धडा म्हणजे, खंबीर राजकीय इच्छाशक्ती दाखवून ईशान्येतील आणि खरे म्हटले तर साऱ्या देशातील अंतर्गत सीमाप्रश्न तातडीने मिटवून टाकायला हवेत. 'आपण वेगळ्या राज्यांत राहात असलो तरी आपला सगळ्यांचा देश एकच आहे,' ही भावना सीमावादाची धार कमी करणारी असते. असायला हवी. आसाम आणि मिझोराम यांच्या सशस्त्र संघर्षात नेमकी हीच 'राष्ट्रीय भावना' हरवलेली दिसते. नाहीतर, आपल्याच देशबांधवांवर निव्वळ सीमावादातून कोणी मशीनगन्स चालवत नाही. आज ईशान्येत भाजपप्रणित एनडीएची किंवा मित्रपक्षांची सरकारे आहेत. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात जन्माला आलेल्या ईशान्येच्या खात्याला सध्या विशेष महत्त्व आले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हा दोन्ही बाजूंचा सीमाभाग आधी केंद्रीय दलांच्या ताब्यात सोपवायला हवा आणि त्यानंतर ईशान्येतील सर्व सीमावाद सामंजस्याने सोडविण्यासाठी वेगाने पावले टाकायला हवीत.

# माथेरान मधील युवा महिलांसह जेष्ठ नागरिकांचा कल शिवसेनेच्या दिशेने



**दै.रायगड नगरी । माथेरान**

आपल्या जीवनातील अनेक चढउतार अगदी जवळून पाहिलेले आहेत तर कित्येक निवडणुकीत एखाद्या पक्षाच्या पारड्यात आपले बहुमूल्य मत देऊन आपल्या वार्डातील उमेदवाराला निवडून विजयी केलेलं आहे. परंतु निवडून आल्यावर जेष्ठांच्या तोंडाला पाने पुसली असल्याने आता त्यांच्यावर आता विश्वास नसल्याने गावात कार्यरत असलेला अन सर्वसामान्य लोकांना वेळप्रसंगी मदतीचा हात पुढे करणारा एकमेव पक्ष म्हणून शिवसेना हाच असल्याने ह्या पक्षाने आपल्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात जी काही उल्लेखनीय कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत आणि बहुतांश कामे उत्तम प्रकारे मार्गी लावली आहेत हे लक्षात घेऊन आता येथील जेष्ठ नागरिकांनी स्वेच्छेने शिवसेनेचे शिव बंधन बांधण्यास सुरुवात केली आहे. माथेरान मधील जेष्ठ नागरिक दशरथ चव्हाण यांनी जनसंपर्क कार्यालयात शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला आहे. त्यांना यावेळी शिव बंधन बांधून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, वन समिती अध्यक्ष योगेश शेठ जाधव, चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष सूर्यकांत कारंडे, सागर पाटील, अनंत शेलार,गणेश कदम, सिताराम शिंदे, विजय सावंत, दत्ता सनगरे, विकास पार्टे यासंह अन्य उपस्थित होते.

तर महिला वर्गाने सुध्दा प्रत्येक वार्ड पिंजून काढले आहेत शिवसेनेच्या महिला आघाडी संघटक संगीता जांभळे यांच्या कामाची पद्धत पाहून पद्मा सकपाळ यांनी सुध्दा आज स्वखुशीने शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.यावेळी महिला आघाडीच्या शहर संघटक संगीता जांभळे, उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे, शलाका शेलार, श्रुतिका दाभेकर, अनिता मोरे, ऐश्वर्या शिंदे, संजना शेलार, रचना सावंत, योगिता चौगुले, अंकिता मोरे, रिझवाना शेख, हेमा सुरेश कदम, निकिता कदम,जुलेखा पटेल, दीपा परब, सुजाता शिंदे, निशा पार्टे, सविता शिंदे, कल्याणी शिंदे, जयश्री कदम, सविता कारंडे, सुहासिनी शिंदे आदी महिला मोठया प्रमाणावर उपस्थित होत्या.या सर्व नवोदित पक्ष प्रवेश करणाऱ्याचे शिवसेनेच्या आपल्या हक्काच्या कुटुंबात नेते मंडळींसह सर्व शिवसैनिकांनी सहर्ष स्वागत केले असून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खारेपाटात शिवसेनेचा भगवा फडकावण्यासाठी शिवसैनिक सज्ज : राजा केणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुका शिवसेना प्रमुख राजा केणी यांनी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली खारेपाट विभागात शिवसेनेची घौडदौड सुरुच ठेवली आहे. या विभागात शिवसेनेच्या १० शाखा सुरु करण्यात आल्या असून यातून पक्षवाढीला अधिक गती मिळणार आहे. शिवसेनेची खारेपाट विभागात सुरु असलेल्या घौडदौडीने शेतकरी कामगार पक्षाच्या नेतेमंडळींमध्ये चांगलीच खळबळ माजली आहे.

८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे हिंदुहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार अलिबाग तालुक्यात राजा केणी यांनी आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले आहे. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवारी कुसुंबळे ग्रामपंचायतीच्या सभागृहात ३५० आदिवासी बांधवांना खावटी वाटप करण्यात आले. यामुळे आदिवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे सामाजिक कार्य सतत चालू राहणार असे राजा केणी यांनी सांगितले. त्याचबरोबर वाढदिवसानिमित्ताने खारेपाट विभागात नव्या शाखा सुरु करण्यात आल्या आहेत. गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक या धोरणानुसार जिल्हा परिषदेच्या कुर्डुस मतदार संघात शिवसेनेची मजबुत पक्षबांधणी सुरु आहे. पेझारी, आंबेपुर, बांधण, ताडवागळे, कोळघर, दळी– मरोशी, मेढेखार, आनंदवाडी–कुर्डुस या ठिकाणी नव्याने शिवसेनेच्या शाखा सुरु करण्यात आल्या आहेत. गोरगरीबांच्या अडीअडचणीला धावून जाणारा पक्ष म्हणून शिवसेनेची प्रतिमा सर्वसामान्य नागरिकांच्या मनात ठासून भरली जात आहे. यास येथील नागरिकांचा शिवसेनेला पुर्णपणे सहकार्य मिळत असून शेतकरी कामगार पक्षाच्या नेतेमंडळींच्या दादागिरीला न जुमानता हे नागरिक शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली एकवटत आहेत. यामुळे शेकापच्या नेतेमंडळींच्या मनात धडकी भरली असल्याचे दिसून येत आहे. या कार्यक्रमाला शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख राजा केणी शिवसेना उप तालुका प्रमुख प्रकाश पाटील शिवसेना पोयनाड विभाघ प्रमुख योगेश जुईकर कुर्डूस जिल्हा परिषद मतदार संघांचे संपर्क प्रमुख शैलेश पाटील विभाग संघटक महेंद्र गोटया पाटील उप संघटक विकास निलकर उप विभाग प्रमुख महेश वावेकर उप विभाग प्रमुख अरविंद पाटील युवा सेनेचे कुर्डूस विभाग प्रमुख अभिषेक पाटील संकेत पाटील भुषण पाटील नवीन शिर्के ग्रामपंचायत सदस्य उत्तम शेठ पाटील प्रमोद पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुरुड तालुक्यातील मजगाव परिसरात पुरप्रतिबंधक उपाययोजना करण्याची ग्रामस्थांची मागणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मागील ११ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुरुड तालुक्यातील मजगाव, खारीकवाडा, उसरोली, आदाड व वाळवटी इत्यादी गावात खाडीला आलेल्या पुरामुळे तेथील ग्रामस्थांच्या घरांमध्ये पाणी शिरून अन्नधान्य, दुचाकी वाहने ,चारचाकी वाहने, टीव्ही ,फ्रीझ, घरातील फर्निचर, कपडे इत्यादी अनेक वस्तूंचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे तसेच या गावांतील भातशेतीमध्ये रेजगा वाहून आल्यामुळे किंवा जमिनीचा वरचा थर वाहून गेल्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे तसेच या गावांतील रस्त्याचा वरील डांबरीचा थर वाहून गेला आहे. मजगाव आरावघर रस्ता हा आता वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे कारण खलाटीकडील रस्त्याचा भाग पुरामध्ये वाहून गेला आहे तेथील पोफळी ,वांद्रे,वेळास्ते ,वावे इत्यादी गावांना हा रास्ता जोडला गेला आहे, पूरग्रस्तांना मजगाव ग्रामपंचायत मार्फत अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले व झालेल्या नुकसानीची मजगाव ग्रामपंचायत मध्ये नावानिशी नोंद करण्यात आली आहे , भविष्यात शासनाकडून पुरग्रस्थांना झालेल्या नुकसानीबाबत आर्थिक मदत येईलही परंतु पुन्हा पुरच येऊ नये म्हणून काही उपाययोजना झाल्यास या पंचक्रोशीतील नागरिकांना कायमस्वरूपी फायद्याचे होईल , यापूर्वी खारलँड विभागामार्फत खाडीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती होत असे परंतु खारलँड विभागाकडे ग्रँट नसल्यामुळे ही कामे होत नाहीत ,मजगावची खाडी ही डोंगरातील गाळ येऊन पूर्णपणे भरली आहे त्यातच भर म्हणजे मजगाव गावातील छोटा जुना पूल तुटून तोसुद्धा खाडीत पडलेल्या अवस्थेतच आहे या खाडीतील गाळ उपसून खाडीच्या बंधाऱ्याची उंची वाढवून उघडयांची संख्या वाढवल्यास पुराचा धोका काही प्रमाणात कमी होईल असे येथील जेष्ठ नागरिकांचे मत आहे.

# महाडकर नागरिकांची भोजन व्यवस्था

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापूर आणि दरड या अस्मानी संकटातून सावरण्यासाठी भाजपच्यावतीने महाडकरांसाठी मदतीचा ओघ सुरूच आहे. त्या अंतर्गत दररोज ०६ हजार महाडकर नागरिकांची भोजन व्यवस्था करण्यात आली असून बिस्किटे, व पिण्याच्या पाण्याची तसेच इतर आवश्यक व्यवस्था केली जात आहे. वरिष्ठ नेते यांच्या निर्देशानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्यावर भोजन तयार करण्याची जबाबदारी सांभाळत असून त्यांची टीम तसेच दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ऍड. महेश मोहिते, उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस मिलिंद पाटील, युवा नेते वैकुंठ पाटील, महाडमध्ये ठाण मांडून असून ते व इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते गरजूंना भोजन, पाणी व इतर मदत पोहोचवत आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे : कारगांव, ता.खालापूर, जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग–३९/१, क्षेत्र १.३९.०० हे.आर. चौ.मी. आकार ०.९२ ही मिळकत नमूद मिळकतीच्या शेतकरी म्हणजेच आमच्या अशिलांना म्हणजेच चिलू धर्मा उघडा, हिरा धर्मा उघडा, उमी पांडुरंग उघडा आणि गणेश पांडुरंग उघडा यांना घरगुती आर्थिक अडचणीस्तव विक्री करावयाचे आहे. तरी सदर मिळकतीचा नमूद शेतकऱ्यांनी कोणाशी भाडेकरार, साठेकरार, बक्षिसपत्र, दानपत्र, विक्री करार केलेला असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत खालील नमूद पत्यावर हरकत द्यावी.

सही/–
ॲड.महेश भद्रिके
बी.ए.एलएलबी.
रा.वावर्ले, ता.खालापूर, जि.रायगड
मो.नं.९०९६३८४६००


# पुरग्रस्तांना रोहा तालुका मनसेच्या वतीने जीवनावश्यक वस्तू व साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड सह राज्यात हाहाकार उडविणाऱ्या अतिवृष्टीने जीवित व वित्तहानी झाली. महापुरात अनेकांची घरे जमीनदोस्त झाली. संसार उघड्यावर पडला, अशातच मनसे पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे व अमित ठाकरे यांच्या आदेशाने देवेंद्र गायकवाड मनसे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष याच्या नेतृत्वाखाली रोहा तालुका मधून मनसे विद्यार्थी सेना व मनसे महिला सेना श्री. साईनाथ धुळे अध्यक्ष– रोहा तालुका विद्यार्थी सेना सौ. दिपश्री गुरव– घासे – मनसे महिला सेना रोहा तालुका यांच्या पुढाकाराने एक हात मदतीचा या मानवतावादी व सेवाभावी दृष्टिकोनातून रोहा तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे महाड येथील पुरग्रस्थांना जीवनावश्यक वस्तू व साहित्याचे वाटप करण्यात आले. महापुरामुळे कधीही भरून न निघावे असे खूप मोठे नुकसान झाले आहे. मात्र संकटात सापडलेल्या पूरग्रस्तांना मदत व दिलासा देण्यासाठी जोरदार काम सुरू आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकानातून मदतीचा ओघ सुरू आहे, या कामात मनसे सैनिक झोकून देऊन काम करत आहेत. मनसे ची मदत देखील मोठ्या प्रमाणात पूरग्रस्तांना मिळत आहे.


## जाहीर नोटीस

मी, श्री.दाजी कृष्णा झिंजुरटे, वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय, भारतीय नागरिक, राहणार : रुम नं.२३, साईराज सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.–अे/१, सेक्टर १४, कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८, या जाहीर नोटीशीने असे जाहीर करतो की,

**मिळकतीचे वर्णन**

१) सदनिकेचे सिडकोकडील वाटपपत्र (Letter of Allotment) दिनांक ०६/०९/१९९५ रोजीचे

वरील कागदपत्र ही सदनिका क्रमांक रुम नं.२३, साईराज सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं–अे/१, सेक्टर–१४, कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८, या मिळकती संदर्भातील कागदपत्रे माझ्याकडून दि.२०/०१/२०१९ रोजी आदर्श नगरहून रिक्षाने प्रवास करताना हरविलेले / गहाळ झालेले आहेत. सदरची कागदपत्रे गहाळ संदर्भात मी दि.०७/०२/२०१९ रोजी ओशविरा पोलीस स्टेशन (अंधेरी) येथे पोलीस स्टेशनमध्ये जावून रजिस्टर ऑफ लॉस्ट प्रॉपर्टी क्रमांक ५२३/२०१९ अन्वये तक्रारी नोंदविली आहे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे कागदपत्र आजरोजी पर्यंत न मिळाल्यामुळे सदरची जाहीर नोटीस करीत आहे.

मी या नोटीशीद्वारे समस्त जनतेस अशी विनंती करतो की, वर नमूद केलेले दस्तऐवज जर कोणाला मिळून आल्यास असे दस्तऐवज ओशविरा पोलीस स्टेशन (अंधेरी) पोलीस स्टेशनमध्ये जमा करावेत किंवा दिलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा ही विनंती.
दि.२८/०७/२०२१

सही/–
श्री.दाजी कृष्णा झिंजुरटे
मो.नं.८३६९४६५७९९



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, १) श्री.गोवर्धन काना म्हात्रे, रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड २) श्री.महादेव काना म्हात्रे, रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड ३) श्रीमती.बाळुबाई रामचंद्र घरत उर्फ निर्मला रामचंद्र पाटील रा.कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड यांची मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्वे नंबर २९/९ क्षेत्रफळ ०.०७.६ (हे.आर.पॉ.) ही जमीन मिळकत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी संपादीत झाली असून त्याचा निवाडा प्रकरण क्रमांक ओवळे, युनिट केस क्र.८८ ने जाहीर झालेला आहे.

सदरहू जमीन मिळकतीचे संपादनाचे नुकसान भरपाईपोटी १२० चौ.मी. क्षेत्राचे विकसित भूखंड मिळणेस १) श्री.गोवर्धन काना म्हात्रे २) श्री.महादेव काना म्हात्रे ३) श्रीमती.बाळुबाई रामचंद्र घरत उर्फ निर्मला रामचंद्र पटील हे पात्र ठरलेले असून शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) ने १) श्री.गोवर्धन काना म्हात्रे २) श्री.महादेव काना म्हात्रे ३) श्रीमती.बाळुबाई रामचंद्र घरत उर्फ निर्मला रामचंद्र पटील यांना भूखंडाचे वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/पुनःस्थापना/२०१५/४३२/OWA-88 दिनांक ०३/०६/२०१५ ने भुखंडाचे वाटप केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड | १६० | ३ | १२० |

माझे अशिल श्रीमती.सविता पांडुरंग वानखेडे रा.ए–३६, गार्गी अपार्टमेंट, संत नामदेव महाराज पथ, जांभुळकर चौक जवळ, पुणे शहर, जि.पुणे ४११०४० हे उपरोक्त नमूद भूखंड त्यातील सर्व हक्क, लाभ व हितसंबंधासहीत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करून घेण्याच्या विचारात आहेत.

तरी उपरोक्त नमूद सदरहू भूखंडाचे बाबतीत अथवा त्याच्या कोणत्याही हिश्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून माझे अशिल सदरहू भूखंड त्यातील हक्क, लाभ व हितसंबंधासहीत त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
ठिकाण : ओवळे, पनवेल
दिनांक : २८/०७/२०२१

सही/–
ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे
मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६



राव साहेब

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७८०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०८/२०२१

कै.डॉ.बळीराम नारायण वाघमारे (मयत) यांचे वारस
१) श्रीमती.सरोज बळीराम वाघमारे
वय : ६२, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.६०३, बिल्डींग एम रेल विहार
को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर ४, खारघर,
पिन नं.४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.दिपाली किरण सैदने
पुर्वाश्रमीची दिपाली बळीराम वाघमारे
वय : ४२, व्यवसाय : नोकरी
यांचे नोटराईज कुलमुखत्यारपत्रधारक
श्रीमती.सरोज बळीराम वाघमारे
वय : ६२, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०२, माऊंट क्लासिक योगी हिल्स
मुलुंड (वेस्ट) ४०००८०
३) श्री.पराग बळीराम वाघमारे
वय : ३८, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.६०३, बिल्डींग एम रेल विहार
को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर ४, खारघर,
पिन नं.४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार क्र.१ ते ३
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसच्या माध्यमातून सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.डॉ.बळीराम नारायण वाघमारे यांचे वारस अर्जदार क्र.१ या पत्नी असून अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.डॉ.बळीराम नारायण वाघमारे यांचा मृत्यू दि.२३/०२/२०२१ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे हॉस्पिटल भायखळा मुंबई येथे निधन झाले.

**कै.डॉ.बळीराम नारायण वाघमारे यांच्या मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.६०३, बिल्डींग एम रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर ४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८ माहे ०७ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

# क्लासेसमध्ये समाविष्ट करून घेण्यात शाळा व्यवस्थापनाकडून मान्यता!

ऑनलाईन क्लासेस मध्ये समाविष्ट केले नसल्याचे स्पष्टीकरण व्यवस्थापनाकडून देण्यात आले. परंतु हे प्रकरण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अन्याय कारक असल्याने २ दिवसात सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन क्लासेस मध्ये समाविष्ट करून घ्यावे. अशी विनंती केली असता शाळा व्यवस्थापनाने ती मान्य केले. यावेळी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत, रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटीका रेवती सपकाळ, महानगर संघटिका शुभांगी शेलार, युवासेना विधानसभा समन्वयक नितीन पाटील, पनवेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते, तालुका अधिकारी केवल माळी व शिवसेनेचे, युवासेनेचे पदाधिकारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महिला मोर्चाकडून महाडमध्ये महिला वर्गाला कपडे वाटप

उत्तम प्रतिसाद दिला. जमा झालेली मदत महाडमध्ये जाऊन पूरग्रस्तांना केली जात आहे. या काळात पूरग्रस्त महिलांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. विशेषतः त्यांना कपड्यांचा तुटवडा जाणवत आहे. हे लक्षात घेऊन भाजप महिला मोर्चा पनवेल शहर मंडलतर्फे विविध प्रकारची वस्त्रे, तसेच सॅनिटरी नॅपकिन जमा करून हे सर्व महाड येथे जाऊन महिलावर्गास देण्यात आले.

या वेळी पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती 'क' सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, सुहासिनी केकाणे, आदिती मराठे, मनिषा चिल्ले, सपना पाटील, रायगड आत्मनिर्भर भारतच्या संयोजक नूतन पाटील, युवा मोर्चा शहर चिटणीस कोमल पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# उरणमध्ये महागाई विरोधात जनवादी महिला संघटनेची निदर्शने

करोना काळात जनतेला झालेला त्रास हा अयोग्य होता,नागरीकाना सुविधा पुरविणे हे सरकारचे काम असल्याचे सांगून या विरोधात आमचा लधानसुरुच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निदर्शना नंतर महिलांचा मोर्चा उरण तहसील वर नेण्यात आला त्यानंतर महिलांच्या एका शिष्ट मंडळाने उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांची भेट घेतली यावेळी महिलांनी त्यांच्या समोर तालुक्यातील विविध समस्या मांडल्या त्या सोडविण्याचे आश्वासन त्यांनी महिलांच्या शिष्टमंडळाला दिले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मोबाईल फोन खेचण्याच्या प्रयत्नात चाकूने केला हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तिघा मित्रांवर हल्ला करून त्यांच्याकडे मोबाईल फोन जबरीने खेचण्याचा प्रयत्न करत असताना त्याला विरोध केल्याने जमलेल्या इतर तिघांनी त्याच्या हातावर चाकूने मारुन जखमी केल्याची घटना शहरातील मालधक्का पटरीजवळ घडली आहे.

सचिन चव्हाण (१८) हा त्याच्या मित्रांसह पनवेलवरुन देवद गावाकडे जात असताना पनवेल रेल्वे स्टेशन मालधक्का पटरीजवळ चार आरोपींनी सचिन चव्हाण व त्याच्या मित्रावर हल्ला करून त्यांच्याकडील मोबाईल फोन जबरीने खेचण्याचा प्रयत्न केला. त्यास त्यांनी विरोध केल्याने त्या तिघांनी त्यांच्या हातातील चाकूने मारुन सचिन चव्हाणसह सिद्धोधन पाईकराव, अनिकेत साळवी या तिघांना जखमी केले आहे. याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कारटेपची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मारुती सुझुकी वॅगेनार गाडी बसविलेला १० हजार रुपये किंमतीचा सोनी कंपनीचा कारटेप अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना शहरातील कल्पतरु रिव्हरसाईडच्या बाहेरील कंपाऊंडच्या रस्त्यावर घडली आहे.

गौरव गोसाळकर (२५) यांनी त्यांची मारुती सुझुकी वॅगेनार गाडी क्र.एमएच-०१-डीपी-५१७५ मध्ये बसविलेला सोनी कंपनीचा कारटेप अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

## मुरुडमध्ये कोळीबांधवांच्या नौका मासेमारीसाठी सज्ज करण्याची लगबग सुरु

**दै.रायगड नगरी । मुरुड**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार १जून २०२१ ते ३१ जुलै २०२१ या काळात माश्यांचा प्रजनन काळ तसेच अंडी घालण्याचा काळ असल्याने मासेमारी बंद करण्यात आली होती. या कालावधीत समुद्र खवळलेला असल्याने खोल समुद्रात मासेमारी करणे धोकादायक असते. परंतु मासेमारी बंदीचा हा काळ ३१ जुलै रोजी संपत असून १ ऑगस्ट पासून कोळी बांधव नव्या जोमाने मासेमारी करण्यासाठी आपल्या नौका सज्ज करताना दिसत आहेत. यामध्ये होड्यांची रंगरंगोटो, किरकोळ दुरुस्ती, डिझेल, बर्फ, तसेच दहा ते बारा दिवस पुरेल एवढे किराणा सामान, जाळ्या लावून ठेवणे इत्यादी कामांमध्ये कोळी बांधव व्यस्त आहेत. कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून ते निसर्गचक्राच्या संकटापासून बेजार झालेला कोळी बांधव येणारा काळ सुखाचा जावो असे साकडे त्यांचे श्रध्दास्थान असलेले एकविरा देवी व जेजुरीचा खंडेराया यांना घालत असल्याचे कोळी बांधवांनी सांगितले.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# महाड पूरग्रस्तांसाठी श्रीवर्धन तालुक्यातून मदतीचा मोठ्या प्रमाणात ओघ ; सर्व समाजाकडून सहकार्य

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील आठवड्यात रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात, त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, खेड या तालुक्यां मध्ये अतिवृष्टी व महापुराने थैमान घा-तले होते. महाड तालुक्यात अतिवृष्टी सोबतच नगरी वस्त्यांवर दरडी कोसळल्यामुळे अनेक नागरिकांना आपले प्राण विनाकारण गमवावे लागले होते. रायगड जिल्ह्यातील महाड व रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, चिपळूण हे तालुके सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी येतात. त्यामुळे घाट माथ्यावरती खूप मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानंतर या ठिकाणी महापूर येतो व प्रचंड प्रमाणात नुकसान होते.

यावर्षी महाबळेश्वर येथे १२० वर्षातला रेकॉर्डब्रेक पाऊस चार दिवसात पडला. त्यामुळे महाडला २००५ पेक्षाही रौद्ररूप धारण केलेली पूरपरिस्थिती सहन करावी लागली. महाबळेश्वर त्याचप्रमाणे सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यानंतर त्याचे पाणी महाड येथील सावित्री नदी मध्ये येते. सावित्री नदी श्रीवर्धन तालुक्यातील बाणकोट खाडीला मिळत असल्याने, समुद्राला भरती आल्यानंतर महाड शहरामध्ये पुराचे पाणी शिरते. रायगड, रत्नागिरी जिल्ह्या बरोबरच या वर्षी पश्चिम महाराष्ट्रातील सांगली-कोल्हापूर-सातारा या जिल्ह्यांनाही महापुराचा तडाखा खूप मोठ्या प्रमाणावर बसला आहे. महाड तालुक्यात महापूर आल्याचे समजताच सर्वप्रथम श्रीवर्धन शहरातील मुस्लिम समाजाने दोन हजार फुड पॅकेट्स त्याचप्रमाणे पाण्याच्या बाटल्या घेऊन महाड कडे जाण्यासाठी प्रयत्न केला. परंतु केंबुरली गावाच्या पुढे महामार्गावर पाणी असल्यामुळे जाणे शक्य नसल्याने पहिल्या दिवशी पाठवलेली मदत पोहोचू शकली नाही.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी देखील श्रीवर्धन येथील मुस्लिम समाजाने मोठ्या प्रमाणावरती खाद्यपदार्थ व पाण्याच्या बाटल्या महाड शहरापर्यंत पोचवण्यात यश मिळवले. त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्वत हिंदू परिषद, बजरंग दल या संघटनांच्या माध्यमातून देखील महाड शहरामध्ये विविध मदत पोचविण्यात आली. त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुक्यातील अनेक गावे, श्रीवर्धन शहरातील सर्व पाखाड्या, आळ्या या ठिकाणच्या नागरिकांनी आपापल्या परीने मदत जमा करून महाडकडे पाठवण्यासाठी आपले प्रयत्न सुरू ठेवले आहेत. महाड शहरात पुराचे पाणी ओसरल्यानंतर अनेक नागरिक आपल्या घरामध्ये गेलेला चिखल व घाण साफ करण्या मध्ये मग्न आहेत. याचाच फायदा काही जण घेत असून श्रीवर्धन तसेच अन्य जिल्ह्यातील, त्याचप्रमाणे मुंबईतून येणारी मदत योग्य प्रकारे नियोजन नसल्यामुळे कोणीही घेऊन जात असल्याचे चित्र महाड शहरात पाहायला मिळत असल्याचे बोलले जात आहे.

त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने बुटाला मंगल कार्यालय या ठिकाणी एक केंद्र उभारले असून महाड शहरात ज्या ठिकाणी नागरिकांना मदतीची गरज आहे, अशा ठिकाणी मदत पोचवण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक योग्य रीतीने पार पाडत आहेत. महाड पूरग्रस्तांसाठी शासकीय मदत पोहोचण्या अगोदर श्रीवर्धन येथील मुस्लीम समाजाच्या नागरिकांनी आपल्या फायबर बोटी घेऊन पूरग्रस्तांना वाचवण्यासाठी महाड शहरात शर्थीचे प्रयत्न केले. एकूणच श्रीवर्धन तालुक्यातून अद्यापही महाड तालुक्याकडे मदतीचा ओघ सुरू आहे.

# महिलेचे फेसबुक अकॉउंट हॅक करून मागितली खंडणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील आदई गावातील एका इमारतीत राहणाऱ्या फिर्यादीच्या पत्नीचा फेसबुक अकाउंट हॅक करून त्यावरील मोबाईल नंबरद्वारे व्हाट्सअपवर फेबूकवरील त्या महिलेचा फोटो घेऊन त्या फोटोला अश्लील फोटो तयार करून व्हाट्सअपवर पाठवून खंडणीची मागणी केली म्हणून खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या सोशल मीडियाचा प्रचंड वापर वाढला आहे. नातेवाईकांबरोबर बोलचाल, व्हिडीओ, फोटोच आदान-प्रदान होत आहेत. एकवेळ सोशल मीडियाचा मुख्य उद्देश मनोरंजन एवढाच असला तरी तो आता विस्तारित झाला आहे. मनोरंजन किंवा संपर्क याचे माध्यम म्हणून नव्हे तर कार्यालयीन कामासाठी सुद्धा सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. जेवढे या माध्यमाचे महत्व वाढतच चालले आहे, तेवढेच त्यावरील धोके वाढत चालले आहे. सोशल मीडियाचे खाते हॅक करून त्यांची वैयक्तिक माहिती, फोन नंबर चो-रणे, चुकीची माहिती प्रसिद्ध करणे, पैशाची मागणी करणे असे प्रकार सध्या समोर येत आहेत. खांदेश्वर परिसरात अशीच घटना घडली आहे. फिर्यादी हा फायनान्समध्ये सेल्स मॅनेजर म्हणून काम करीत आहे. ते या परिसरातील आदई गावाच्या बाजूच्या असलेल्या एका इमारतीत राहत आहे. फिर्यादीच्या पत्नीच्या फेसबुक अकाउंटवर असलेला मोबाईल नंबरच्या व्हॉटसअप् अकाउंटवर अज्ञात इसमाने त्याचा मोबाईल नंबरच्या व्हॉअसप् वरील इसमाने फिर्यादीचे पत्नीचे फेसबुक आकाउंट हॅक करून फेसबुक अकाउंटरवर अपलोड असलेले फोटो क्रॉप करून फिर्यादचे पत्नीचे चेहरा असलेला व दुस-या कोणाच्या तरी अश्लील फोटो पाठवून फिर्यादी यांच्या या मोबाईल नंवर फोन पे करून २०००/- रुपयाची खंडणीची मागणी केली, खंडणीचे पैसे नाही दिले तर फिर्यादीची पोलीसात तक्रार करेन त्याचबरोबर पत्नीचे नग्न फोटो इतरांना पाठवून व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी दिली व शिवीगाळ केली यावेळी फिर्यादी यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. भादवी कलम ३८५,५००,५०४, ५०६,५०७, तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ की ६७, ६७ अ प्रमाणे अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पूरग्रस्तांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटतोय; पण प्लास्टिक बाटल्यांचा प्रश्न ऐरणीवर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड सह कोकणात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला, पुराच्या पाण्याने घरे उध्वस्त झाली, लोकांचे अन्न पाण्यावाचून हाल झाले, आता महाड, पोलादपूर व चिपळूण पूरग्रस्तांना पिण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी बॉटलची मदत दिली जात आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात या प्लास्टिक बॉटल पुन्हा बाहेर पर्यावरणात फेकल्या जाण्याची शक्यता आहे. परिणामी प्लास्टिकचा भस्मासुर परत डोके वर काढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंबरोबरच पिण्याच्या पाण्याची सर्वाधिक गरज आणि निकड आहे. सर्वत्र राडारोडा व चिखल यामुळे घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. अशावेळी बाटलीबंद पिण्याचे शुद्ध पाणी सर्वात उत्तम आणि आरोग्यदायी पर्याय आहे. आणि यामुळेच असंख्य स्वयंसेवी संस्था, राजकीय पक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात एक लिटरच्या पाण्याच्या बाटल्यांचे बॉक्स लोकांसाठी आणत आहेत. या पाण्याच्या बॉटल्सची संख्या लाखोंच्या घरात आहे. शिवाय जीवनावश्यक वस्तूंचे वाटप प्लास्टिक पिशव्यांमध्ये केले जात आहे. हे प्लास्टिक देखील बाहेर फेकले जाईल. सुधागड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते निलेश शिर्के यांनी सांगितले की, अजूनही पावसाळा गेलेला नाही.

त्यामुळे कचरा कुंड्या किंवा डंपिंग ग्राऊंडमध्ये फेकलेल्या या प्लास्टिक बाटल्या व प्लास्टिक जवळच्या नदी, नाले, तलाव आदी ठिकाणी वाहून जातील. परिणामी गटारे, नाले तुंबतील नदीचे प्रवाह अडतील आणि मानव निर्मित आपत्ती ओढवण्याचा धोका संभवतो. त्यामुळे स्थानिक प्रशासन व पर्यावरण विभागाने या संदर्भात काही



नियोजन केले आहे का ? असा सवाल देखील निलेश शिर्के यांनी उपस्थित केला आहे. तसेच रायगड जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत ट्वीट देखील केले आहे. या सर्व प्लास्टिकची योग्य विल्हेवाट व विघटन करावे अशी मागणी निलेश शिर्के यांनी केली आहे.

लोकांनी त्यांच्याकडील प्लास्टिकच्या बाटल्या व प्लास्टिक वेस्टने स्वतःकडे जमा करून ठेवावीत. त्यानंतर स्वयंसेवी संस्था किंवा नगरपालिके मार्फत या प्लास्टिकच्या बाटल्या व प्लास्टिक एकत्र जमा कराव्यात. आणि हे सर्व प्लास्टिक व बॉटल्स विघटनासाठी पाठवून द्यावे. या माध्यमातून हा प्रश्न सुटू शकेल.

# मुरुड तालुक्यातील काशीद पूल दुर्घटनेतील मृत व्यक्तीला मिळाली शासकीय आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । मुरुड**

दिनांक ११ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुरुड तालुक्यातील काशीद येथील छोटा पूल पाण्याच्या लोंढ्याने कोसळला होता या दुर्घटनेत अलिबाग परिसरातून मुरुड कडे येणारे एकदरा येथील रहिवासी विजय चव्हाण आपल्या दुचाकीसह त्यामध्ये पडून मयत झाले होते. घरातील एकमेव कमवती व्यक्ती सोडून गेल्याने कुटुंबावर आभाळ कोसळले होते. कुटुंबाची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. त्या कुटुंबाला भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड विभाग अध्यक्ष महेश मोहिते यांनी भेट देऊन अन्नधान्य तसेच आर्थिक मदत देऊन सांत्वन केले होते. तसेच शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार शासन स्तरावर पाठपुरावा करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर कुटुंबाच्या वारसांना रु चार लाखांची आर्थिक मदत मिळूवून दिली. मयत व्यक्तीचे वारस श्रीमती विजया चव्हाण यांच्याकडे सदर रकमेचा धनादेश मुरुडचे तहसीलदार गमन गावित यांनी सुपूर्द केला.

## मतदार यादीतील छायाचित्र नसलेली नावे वगळणेबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा.भारत निवडणूक आयोगाने ०१ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारीत राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाच्या छायाचित्र मतदार यादीचा संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहिर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत १०० टक्के शुध्द मतदार यादी तयार करण्याची मोहीम भारतीय निवडणूक आयोगाने सुरु केली आहे.

१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण ५७० मतदार यादीभागामध्ये ४६०६६ मतदारांचे फोटो मतदार यादीत नसल्याचे आढळून आले आहे. ज्या मतदारांचे छायाचित्र मतदार यादीत नाही, अशा मतदारांनी आपले फोटो ३१ जुलै पर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी / तलाठी किंवा निवडणुक शाखा तहसीलदार कार्यालय पनवेल येथे जमा केले नाहीत, तर मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतील. याबाबत मतदारांची नावे वगळण्याबाबतची नोटीस दिनांक २४/०७/२०२१ रोजी दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक किल्ले रायगड, दैनिक रायगड नगरी, दैनिक रायगड टाईम्स, दैनिक कृषीवल, दैनिक नवराष्ट्र, दैनिक राम प्रहर, दैनिक वादळवारा व दिनांक २५/०७/२०२१ रोजी दैनिक लोकमत, दैनिक निर्भिड लेख या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे.

तरी मतदारांनी त्यांचे नाव नोंदणी, दुरुस्ती अथवा वगळणी बाबत त्यांचे यादीभागाशी संबंधित बि.एल.ओ., तलाठी किंवा निवडणूक शाखा तहसीलदार कार्यालय पनवेल येथे अथवा raigad.nic.in संकेतस्थळास कृपया भेट देण्याबाबत, तसेच त्यांचे फोटो व अधिवासाचा पुरावा ३१ जुलै २०२१ पर्यंत कृपया सादर करावा.

**सही/-**
**(दत्तात्रेय नवले)**
**मतदार नोंदणी अधिकारी**
**१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ**
**तथा उपविभागीय अधिकारी पनवेल विभाग पनवेल**

अर्जदाराचे अधिवक्ता
जयेश संभाजी म्हसे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश पनवेल रायगड यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५५/२०२१
ने.ता.०२/०९/२०२१

श्रीमती.आशा रवींद्र बोराडे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.हालीवली, ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार यांस कुमार गौरव वय : १५ असा मुलगा आहे. अर्जदार आणि कुमार गौरव, कुमारी ऐश्वर्या, कुमारी दक्षता यांचे नावे खालील वर्णनाची अविभक्त सामाईक हिश्याची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : हालिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १ | ८/१/ब | ०-९०-०० | ७-७३ |

(जिचा उल्लेख येथून पुढे पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने ''अर्ज मिळकत'' असा केलेला आहे.)

वर वर्णन केलेली मिळकत कुमार गौरव, कुमारी ऐश्वर्या, कुमारी दक्षता यांचे पालनपोषणाकरिता त्यांच्या पुढील महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाकरिता आणि अर्जदार यांच्या आर्थिक अडचणीपोटी विक्री करणेची आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी कुमार गौरव यांच्या अर्ज मिळकतीमधील असलेल्या अविभक्त हिश्याची नैसर्गिक पालक म्हणून विक्री करणेकरिता परवानगी मिळणेसाठी या मा.न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार यांच्या हक्कास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास तसे त्यांनी लेखी पुराव्यासह या मा.न्यायालयात सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस कुमार गौरव याचे नैसर्गिक पालक म्हणून अर्ज मिळकतीमधील कुमार गौरव याचा अविभक्त हिस्सा विक्री करणेची परवानगी देईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-** **क.लिपीक** **जिल्हा न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **जिल्हा न्याया, पनवेल**

मा.श्री.राव साहेब

अॅड.राजेश बांगर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९०५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.८/९/२०२१

१) श्रीमती.कुसूम गोपीनाथ नाईक
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.सुधीर गोपीनाथ नाईक
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.रोहिदास गोपीनाथ नाईक
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
अर्जदार क्रं.१ ते ३ रा.कोल्ही कोपर, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.सचिन गोपीनाथ नाईक
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.शिवशक्ती को.ऑ.सो.खांदा कॉलनी, रुम नं.२, प्लॉट नं.१५, सेक्टर ९, व्हीटीसी नवीन पनवेल — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ ते ४ यांचे वडील कै.गोपीनाथ गणू नाईक यांचे निधन शेलार हॉस्पिटल, खांदा कॉलनी येथे दि.३०/०५/२०२१ रोजी झाले आहे. श्रीमती.कुसूम गोपीनाथ नाईक वगैरे ह्यांनी कै.गोपीनाथ गणू नाईक यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै.गोपीनाथ गणू नाईक यांच्या नावे असलेल्या सामाईक मिळकतींचे वर्णन सोबत परिशिष्ट अ, ब, क अन्वये जोडलेले आहेत.

वर श्रीमती.कुसूम गोपीनाथ नाईक वगैरे ह्या कै.गोपीनाथ गणू नाईक यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.कुसूम गोपीनाथ नाईक वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गोपीनाथ गणू नाईक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध णल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२७/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**परिशिष्ट 'अ'**
**मिळकतीचे वर्णन**
**अ) मौजे : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथील सामाईक मिळकतीचे वर्णन**

| भूमी संपादन निवाडा क्रं. | सर्व्हेक्षणानुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे / संपादीत जमिनीचे क्षेत्र चौ.मी. | बांधकामाचा प्रकार | निवाड्यानुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
| KOL-ICIG-28 | KL-179<br>KL-180<br>KL-181<br>KL-182<br>KL-183<br>KL-184 | १६६.५२ | निवासी | ३२८.७८ | वडघर | ३ | २५५ | ७०० |

**परिशिष्ट 'ब'**
**मौजे : पारगाव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमी संपादन निवाडा क्रं. | एकूण संपादीत जमिनीचा तपशिल | | बांधकाम असल्याचा त्याचा तपशिल | | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र | भूखंड वाटपाचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमापन क्र. | क्षेत्र | बांधकामा बद्दल पुनस्थापना नेण्यासाठी वाटप करावयाचे क्षेत्र | बांधकाम धारकाचे नाव | | | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
| PARGAON 165 | 38/4<br>41/4<br>54/1 | ०.१५.०<br>०.०९.१<br>०.२५.० | ६८०.०० | पांडुरंग गणू नाईक, रोहिदास गोपीनाथ नाईक, विशाल गोकुळ नाईक, सोपान नारायण नाईक | १,५७०<br>९१०<br>१८२० | २४७.२८<br>१४३.३२<br>२८६.६५ | ८ | १२८ | १५८० |

**परिशिष्ट 'क'**
**मौजे : पारगाव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र | वाटप विकसित भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| २१९ | २३/३<br>२३/४<br>२७/१/१५ | ०.२४.८<br>०.३४.८<br>०.१४.२ | ११७० चौ.मी. |

| भूमी संपादन निवाडा क्रं. | एकूण संपादीत जमिनीचा तपशिल | | बांधकाम असल्याचा त्याचा तपशिल | | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र | भूखंड वाटपाचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमापन क्र. | क्षेत्र | बांधकामा बद्दल पुनस्थापना नेण्यासाठी वाटप करावयाचे क्षेत्र | बांधकाम धारकाचे नाव | | | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
| PARGAON 299 | 23/3<br>23/4<br>27/1/15 | ०.२४.८<br>०.३४.८<br>०.१४.२ | ---- | ---- | २,४८०<br>३,४८०<br>१,४२० | ३९०.६०<br>५४८.१०<br>२२३.६५ | ३ | ४४ | ११७० |

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## एसटी स्टँड परिसरातून मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल एसटी स्टँड परिसरात एका प्रवाशाचा मोबाईल चोरल्याची घटना घडली आहे.

निशांत मुरले (वय-१९) हा बस स्टॉपवर तहान लागल्याने मोबाईल बाजूला ठेवून पाणी पित असताना एका इसमाने सदर मोबाईल चोरून तो पसार झाला आहे. या मोबाईलची किंमत ५ हजार इतकी असून याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील रूपाली टॉकिज समोरील बिकानेर दुकानाच्या पोट माळ्यावर एका तरूणाने अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

मुकेश चौधरी (वय-२२) असे या तरूणाचे नाव असून बिकानेर स्विट्सच्या पोटमाळ्यावर जाऊन एका झेंड्याच्या सहाय्याने सिलींगच्या हूकला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यु म्हणून नोंद करण्यात आली आहे.

## पुरग्रस्तांना सुधागड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड सह राज्यात हाहाकार उडविणाऱ्या अतिवृष्टीने जीवित व वित्तहानी झाली. महापुरात अनेकांची घरे जमीनदोस्त झाली. संसार उघड्यावर पडला, अशातच एक हात मदतीचा असे आवाहन करत सुधागड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सलग दोन दिवस महाड येथील पुरग्रस्थांना जीवनावश्यक वस्तू व साहित्याचे वाटप करण्यात आले. आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व रायगड महिला जिल्हाध्यक्षा गीता ताई पालरेचा यांच्या नेतृत्वाखाली ही मदत देण्यात आली.यापुढेही ही मदत केली जाईल असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी सुधागड तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महाडमध्ये नवेनगर, पंचशिल नगर आदी परिसरातील नागरिकांना ब्लँकेट, पाण्याच्या बॉटल, चादरी, बिस्किट पुडे, टॉवेल, चटया, फरसाणची पाकिटे अश्या विविध वस्तूंचे वाटप केले. तालुक्यातील सर्व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते अशा कठीण परिस्थितीत एकत्र येऊन मदत व श्रमदान करत आहेत. अशी माहिती जिल्हाध्यक्षा गीता पालरेचा यांनी दिली. यावेळी गीता पालरेचा यांच्यासह रमेश साळुंखे, संदेश शेवाळे, सुलतान बेणसेकर, किरण मढवी, सुशील शिंदे, किरण खंडागळे, ललित ठोंबरे, राकेश बेलोसे, अविनाश माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसेना सदस्य नोंदणी अभियानास माथेरानमधून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेना पक्षप्रमुख तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक २७ जुलै २०२१ पासून माथेरानला शिवसेना सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्यात आले आहे.

शिवसेना संपर्क कार्यालय येथे दिनांक २७ जुलै २०२१ रोजी संध्याकाळी ठीक ५-३० वाजता या अभियानास सुरुवात होऊन सदस्य अर्ज नोंदणी केली जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक दशकापासून मराठी, मराठेतर माणसाच्या हक्कासाठी, प्रश्नासाठी तसेच सामान्य जनतेच्या समस्येसाठी, न्याय हक्काच्या लढ्यासाठी लढणाऱ्या शिवसेना पक्षाशी आपण जोडले जाणार आहात.

वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात शिवसेना स्थापन झाली तेच नेतृत्व पक्ष प्रमुख उद्धवसाहेब ठाकरे हे एका



विलक्षण ध्येयाने, ध्यासाने व कर्तव्यनिष्ठेने पुढे घेऊन जात आहे.

माथेरानवर त्यांचे विलक्षण प्रेम, आत्मियता आणि दिलेला शब्द खरा करण्यासाठी आर्थिक निधी कमी पडू देणार नाही, ही खात्रीशीर हमी तेव्हा, माथेरानच्या पुढच्या पिढीच्या हितासाठी व सर्वांगीण विकास करून माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ करून पर्यटन वाढ करण्यासाठी शिवसेनेचे हात बळकट करण्यासाठी शिवसेनेच्या कुटुंबातील सदस्य होण्याचा मान मिळवा असे आवाहन शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संपर्क प्रमुख प्रसाद सावंत,शहर संघटिका संगीता जांभळे यांनी केले आहे.

यावेळी नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, अवधूत येरफुलें,शिवसैनिक सागर पाटील, दिनेश कदम,सूर्यकांत कारंडे,सिताराम शिंदे, निमेश मेहता, बाळू दाभेकर, बंटी साबळे, नरेश (सतीश)साबळे, गौरंग वाघेला, लक्ष्मण कदम, दिलीप सकपाळ, अजमुद्दीन नालबंद,समीर पन्हाळकर, नितीन सावंत,विजय सावंत, गणेश कदम, अनंत शेलार यांसह महिला आघाडीच्या शहर संघटक संगीता जांभळे, उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे, शलाका शेलार, श्रुतिका दाभेकर, अनिता मोरे, ऐश्वर्या शिंदे, संजना शेलार, रचना सावंत, योगिता चौगुले, अंकिता मोरे, रिझवाना शेख, हेमा सुरेश कदम, निकिता कदम,जुलेखा पटेल, दीपा परब, सुजाता शिंदे, निशा पार्टे, सविता शिंदे, कल्याणी शिंदे, जयश्री कदम, सविता कारंडे, सुहासिनी शिंदे आदी महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

# पोलादपूर शहरातील जुन्या नळपाणी पुरवठा योजनेची जॅकवेल वाहून गेल्याने १ कोटीची तरतूद

**महाड शहर स्वच्छतेसाठीदेखील ५० लाखांचा निधी उपलब्ध : ना. आदिती तटकरे यांची माहिती**

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरातील महाबळेश्वर रस्त्यावरील नगरपंचायतीच्या जुन्या नळपाणी पुरवठा योजनेची जॅकवेल वाहून गेल्याने महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुदीतून सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी ही माहिती दिली.

पोलादपूर तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या शहरात पाच वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर झाले असून ग्रामपंचायतीच्या काळात जुनी नळपाणी पुरवठा योजना व विस्तारित पाणी पुरवठा योजना या दोन्ही योजना कार्यान्वित करण्यात आल्या.

यापैकी विस्तारीत नवीन नळपाणी पुरवठा योजनेचा फिल्टरेशन प्लांट अद्याप पुर्ण झाला नसल्याने योजना अद्याप नगरपंचायतीकडे वर्ग झाली नाही. अशातच, महाबळेश्वर जुन्या नळपाणी पुरवठा योजनेची जॅकवेल गेल्या गुरुवारी सायंकाळी अतिवृष्टीमुळे सावित्री नदीच्या पुरात वाहून गेली. याच रात्रीपासून पोलादपूर तालुक्याचा विद्युतपुरवठा खंडीत झाला असल्याने पोलादपूर शहराचा नळपाणीपुरवठा बंद झाला आहे. मुख्याधिकारी विराज लबडे यांनी सदर रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी यासंदर्भात राज्य सरकारकडे तातडीने पाठपुरावा केला. यामुळे राज्यमंत्रीमंडळाच्या बैठकीत



महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुदीतून सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असल्याची माहिती ना. तटकरे यांनी दिली. यावेळी महाड नगरपालिका क्षेत्रातील पुरानंतर निर्माण झालेली अस्वच्छता दूर करण्यासाठी राज्यसरकारने ५० लाखांच्या निधीची तातडीने उपलब्धता करून दिली असल्याचीही माहिती ना. अदिती तटकरे यांनी दिली.

जुनी नळपाणी पुरवठा योजना पोल-ादपूर ग्रामपंचायत असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केली असून रायगड जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांकडून वाहून गेलेल्या जॅकवेलचे तसेच नवीन जॅकवेलला तडे गेल्याने दुरुस्तीसाठी अपेक्षित खर्च यासंदर्भात अंदाजपत्रक तयार करून राज्यसरकारला पाठविण्यात येणार आहे. पोलादपूर नगरपंचायतीकडे अभियंत्यांची पदे रिक्त असल्यानेही तातडीची बाब लक्षात घेऊन कार्यवाही करण्यात आली असल्याचे यावेळी पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी सांगितले.

पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी वाहून गेलेल्या जॅकवेलमधील पंपांची तसेच पॅनलची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी पुणे येथे पाठविण्यात आले असून येत्या दोन-तीन दिवसांत नळपाणी पुरवठा योजना पोलादपूर शहरा-तील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी सक्षम असेल, असा विश्वास व्यक्त केला.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी राष्ट्रवादीच्या महिला सरसावल्या

**दै.रायगड नगरी । वाकण**

महाड येथील पूरग्रस्तांसाठी मदत म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे शहर महिला आघाडी व शांतीनगर महिला मंडळ यांच्या वतीने तांदूळ, गहू, फरसाण, बिसलेरी पाणी, बिस्कीट, नॅपकिन, मास्क तसेच महिलांना उपयुक्त असे कपडे आदी सामान टेम्पो द्वारे बुधवारी महाडकडे रवाना करण्यात आला. पूरग्रस्तांना मदत करून राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे शहर महिला आघाडी व शांतीनगर महिला मंडळ यांनी माणुसकीचे दर्शन घडविले. नागोठणे शांतीनगर भागातून मदतीचा सामान महाड कडे रवाना करताना राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी शहर अध्यक्षा सुजाता जवके, जिल्हा सरचिटणीस आशा शिर्के, शहर उपाध्यक्षा प्रतिभा तेरडे, स्नेहल काळे, ऐश्वर्या शहासने, प्रणिता शहासने ,सविता शहासने , श्रद्धा शेडगे ,सुनीता तटकरे, सुनीता दास, संध्या जाधव आदी महिला वर्गासह सुधाकर जवके, नितीन पत्की, सिद्धेश काळे आदी उपस्थित होते.

# मूर्ती रूपाने श्री साई नारायण बाबा पुन्हा अवतीर्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२० मे २०२१ रोजी श्री साई नारायण बाबा ब्रह्मलीन झाले.भगवती साई संस्थानच्या पनवेल येथील भव्य साई मंदिरात त्यांची विधीवत समाधी बांधण्यात आली होती. त्यांची सजीव मूर्ती स्थापित करण्याचा सोहळा साई भक्तांच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न झाला. विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नंतर श्री साई नारायण बाबा यांच्या गेल्या वर्षीच्या गुरुपौर्णिमा कार्यक्रमाची व्हिडिओ सिडी लावून, साई भक्तांना विधिवत दीक्षा देण्यात आली. तसेच श्री साई नारायण बाबा यांचा उपदेश आणि आशीर्वाद ही साईभक्तांना प्राप्त झाला.

त्यानंतर श्री साई नारायण बाबा यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा सुरू झाला, या मध्ये होमहवन नवग्रह शांती इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होता.या आधी नऊ दिवस रोज एका प्रकारच्या धान्यांमध्ये त्यांना ठेवण्यात



आले होते.बरोबर साडे बारा वाजता ब्राह्मणांनी मंत्र उच्चारण करीत श्री साई नारायण बाबांच्या मूर्तीच्या डोळ्यावर बांधलेली पट्टी काढून सर्वांना मूर्तीचे दर्शन दिले. ही मूर्ती नव्हे तर प्रत्यक्ष साई नारायण बाबाच प्रत्यक्ष समोर बसले आहेत असे सर्वांना वाटत होते,इतकी ही मूर्ती सजीव आहे. श्री साई नारायण बाबा यांनी चार वर्षापासून आपली देह त्यागाची योजना आखली होती. त्याप्रमाणे त्यांनी आपली मार्बलची मूर्ती बनवून घेतली होती.

लॉकडाऊनच्या काळात फेसबुक वर रोज संध्याकाळी सात वाजता साईवाणी हा ऑनलाईन सत्संग सुरू करून त्यांनी साईभक्तांना साईबाबां पासून विभक्त होऊ दिले नाही. त्यांनी ४०१ दिवस ऑनलाईन साई वाणी सत्संग पूर्ण केले,त्यानंतर अचानक त्यांची तब्येत बिघडली त्यांना कोपरखैरणे येथील रिलायन्स हॉस्पिटल मध्ये अधिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते परंतु त्यांनी आपल्या पूर्व योजनेनुसार २० मे २०२१ रोजी देहत्याग केला.

त्यांच्या जाण्याने लाखो साई भक्तांना दुःख झाले होते परंतु आता मूर्ती रूपाने साई भक्तांच्या कल्याणासाठी श्री साई नारायण बाबा पुन्हा अवतीर्ण झाल्याने साई भक्तांना खूप आनंद झाला आहे. ही मूर्तीसुद्धा इतकी सजीव आहे की प्रत्यक्ष श्री साई नारायण बाबाच समोर बसले आहेत असे वाटते.

# माथेरानमध्ये नभ उतरू आलं



**दै.रायगड नगरी । माथेरान**

वर्षाऋतुत निसर्गातील साक्षात सुखद अनुभव घेण्यासाठी माथेरान या पर्यटनस्थळा शिवाय पर्याय नाही.कधी कधी रिमझिम तर कधी मुसळधार पडणाऱ्या पावसात ओलेचिंब भिजण्याचा आनंद सुध्दा काही औरच असतो. घाटरस्त्यावरून पायी चालत येताना चिंब न्हाऊन निघालेले उंचच उंच डोंगर आणि त्यावरून पांढऱ्या शुभ्र फेसाळणा-या पाण्याचा स्त्रोत,हे पडणारे जलप्रपात एवढ्या उंचीवरून खाली धरणीवर येताना त्यांनाही एकप्रकारे भीती वाटत असावी म्हणून की काय ते वाऱ्याच्या झोकाने हवेतच विरून पसरत असतात. याच न्हाऊन निघालेल्या डोंगरावर झाडी सुध्दा हरित दिसते त्यामुळे नैसर्गिक चकाकी, डोंगराने हिरवा साज चढवून आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी जणूकाही साद घालत असतो. ठिकठिकाणी दुग्धजन्य स्वरूपातील निर्जरांनी आपल्या वाटा मोकळ्या करून मनसोक्तपणे डोंगर कपारीतून खळखळत वाहत असतात.हा एक विलक्षण क्षण डोळ्यांत साठवण्यासारखाच असतो. तर माथेरान मध्ये आल्यावर चिंब भिजलेले असताना एखाद्या टपरीवर गरमगरम मका, भजी, चहाचा आस्वाद हवाहवासा वाटतो. पॉईंट्स वरून देखील अनेकदा दाट धुक्यामुळे काही अंतरावरील सुध्दा स्पष्टपणे दिसत नाही सभोवताली नभ उतरले आहेत की काय हा भास आपल्याला हमखास झाल्याशिवाय राहत नाही. त्यातच पायी चालताना सुध्दा पॉईंट्स वरील नैसर्गिकरित्या सौंदर्य न्याहाळण्याची एकप्रकारे भूक लागलेली असते त्यामुळेच जराही ग्लानी, थकवा जाणवत नाही पाय आपोआप पुढे सरकत असतात वर्षाऋतुत मित्र मंडळींसोबत वर्षा सहलीसाठी आल्यावर इथला ओतप्रोत भरलेला निसर्ग पाहून तहानभूक हरपून जाते.मोटार वाहनांस इथे पूर्वीपासूनच बंदी असल्यामुळे एकूणच बावन्न किलोमीटर परिसराची भटकंती करण्यासाठी इथे अन्य स्थळांप्रमाणे यांत्रिक सुविधा अथवा अद्यापही ई-रिक्षाची सोय उपलब्ध नसल्याने कमी बजेट मध्ये येणाऱ्या सर्वसामान्य पर्यटकांना पायी चालत जाणे हा सुद्धा एकमेव पर्याय आहे. मुंबई पुण्यापासून अगदी जवळ असल्याने इथे वर्षाऋतुत सुट्टयांच्या हंगामात मोठया प्रमाणावर पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते.शारलोट लेक हे येथील एक आकर्षण असून या लेकच्या पूर्वेला दुथडी भरून वाहणाऱ्या पाण्याखाली मनसोक्त भिजण्याचा आनंद एखादया धबधब्यापेक्षाही काही कमी नाही.हौशी पर्यटकांसाठी घोडा आणि जेष्ठ पर्यटकांना हातरीक्षाच्या माध्यमातून पॉईंट्सची सैर करता येते.दस्तुरी या माथेरानच्या प्रवेशद्वाराजवळ उतरल्यावर गावात येण्यासाठी तीन किलोमीटर अंतरासाठी रेल्वे प्रशासनाने स्वस्त दरात शटल रेल्वे सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे थेट गावात यायची सुविधा उपलब्ध आहे.अन्य स्थळांच्या तुलनेत खूपच स्वस्त दरात घरगुती लॉज अथवा बजेट प्रमाणे मोठमोठी हॉटेल्स इंडस्ट्री आहे. नेरळ स्टेशन वरून माथेरानला येण्यासाठी नेरळ स्टेशन बाहेर चोवीस तास टॅक्सी सेवा उपलब्ध असते.दस्तुरी (पार्किंग) येथून अमन लॉज रेल्वे स्टेशन ते माथेरान स्टेशन दरम्यान माफक दरात शटल सेवा वेळेनुसार असते.

# पनवेलच्या फार्महाऊस चालकाना पोलिसांनी बजावल्या नोटीसा

**शासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याच्या सूचना**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील फार्महाऊस, रिसॉर्ट, रेस्टॉरंट अगर शेतावर वेगवेगळया कार्यक्रमाकरिता मालक आपली जागा भाडेतत्वावर देत असल्याबाबत पोलिसाना माहिती प्राप्त झाली आहे. कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला कोरोनाचा आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रसार होत आहे. यासाठी शासनामार्फत वेळोवेळी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंध अधिनियम, १८९७ लागू करण्यात आलेला असून, यासंदर्भातील अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सामाजिक, राजकीय, क्रिडा, मनोरंजन, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमास बंदी केलेली आहे. त्यामुळे पनवेलच्या फार्महाऊस चालकाना पोलिसांनी नोटिसा बजावल्या आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यानी २७ जुलै रोजी फार्म हाउस चालक आणि मालक यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी शासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टिने प्रसिध्द असून मुंबई, पुणे, ठाणे या सारख्या महानगराच्या नजिक असल्याने खुप मोठया प्रमाणात पर्यटक हे रायगड जिल्हात येत असतात. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता व राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा निर्गमित केलेली आहे. तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे अशा प्रकारचे कार्यक्रमांचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून वारंवार फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश जारी करण्यात येत आहेत. पनवेल परिसरात मालकीच्या फार्महाऊस, रिसॉर्ट, रेस्टॉरंट व शेतावर येणारे नागरीक कुटुबांसह, नातेवाईक, मित्रपरिवार हे जवळील पाण्याचे धरण, नदी व धबधबे येथील पाण्यात आनंद लुटण्यासाठी मद्यप्राशन करून जात असतात. तसेच डोंगर किल्ल्यांवर ट्रॅकिंग करीता जात असतात. परंतू डोंगरभागात पडणाऱ्या पावसाचा अंदाज न आल्याने पाण्यात पडून वाहून, बुडून व रस्ता चुकून खाली पडून अपघात होण्याच्या घटना वारंवार होत असतात. तरी असा कोणाच्या जिवीतास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील, तसेच सहभागी होणाऱ्या लोकांचे जिवीतास कोणत्याही प्रकारे धोका होणार नाही याची संपुर्ण जबाबदारी फार्महाऊस, रिसॉर्ट, रेस्टॉरंट मालक चालकानी घ्यावी असे पोलिसानी बजावले आहे. तसेच आनंद साजरा करत असतांना कोणत्याही प्रकारे जुगार खेळताना अगर दारूचे अथवा ड्रग्जचे सेवन करताना मिळून आल्यास अथवा डी. जे., लाऊडस्पिकर लावून मोठ्याने गोंगाट करून आजूबाजूचे लोकांना उपद्रव करीत असतांना मिळून आल्यास संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांनी सांगितले.

# उरणच्या छत्रपती शिवाजी सामाजिक संस्थेमार्फत महाड पूरग्रस्तांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । उरण**

महाड येथील पूरग्रस्त नागरिकांची समस्या, व्यथा लक्षात घेता. महाड येथील पूरग्रस्तांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरण तर्फे महाड येथील कोंडीवते ग्रामपंचायत तसेच नागलवाडी फाटा येथे घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पूरग्रस्त नागरिकांच्या घरांना भेटी देत, त्यांच्या दुःख वेदना समजावून घेऊन पूरग्रस्त नागरिकांना सामान वस्तू वाटप करण्यात आले.संस्थेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना सदर परिस्थिती बघून अश्रू अनावर झाले.

यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरणचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, उपाध्यक्ष हेमंत पवार, खजिनदार सुरज पवार, संपर्क प्रमुख ओमकार म्हात्रे, आकाश पवार, नितेश पवार, सुविध म्हात्रे, साहिल म्हात्रे, हेमंत ठाकूर, इंद्रजित पवार, अभिजित भोईर आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. प्रत्येक पूरग्रस्त व्यक्तींना सामानाचे प्रत्येकी एक किट देण्यात आले. एका किट मध्ये गहू, तांदूळ, इतर अन्नधान्य.कपड्याचे साबण, आंघोळीचे साबण, टूथ ब्रश, टूथ पेस्ट, पाणी बॉटल, चादर, बेडशीट, सतरंजी, कपडे,टॉवेल,बिस्कीट, फरसाण, साखर, चहा पत्ती यासह इतर जीवनाश्यक वस्तूंचा समावेश होता. कोंडीवते ग्रामपंचायतचे सरपंच सु-नील डाऊर,उपसरपंच -राजाराम शिंदे,पोलीस पाटील धोंडीराम दिघे,माजी सरपंच -पांडुरंग पवार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष -रघुनाथ सावंत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या मान्यवरांच्या हातात ४० किट देण्यात आले तसेच इतर ५० किट वेगवेगळ्या भागात घरोघरी जाऊन वाटण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, ग्रामस्थांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरणच्या कार्याचे कौतुक करत आभार मानले.